# "बेंच नेता प्रणालीची उपयुक्तता" –एक प्रायोगिक अध्ययन

**प्रा.डॉ.सौ. रमा रमेश फुके**
प्रियदर्शिनी शिक्षण महाविद्यालय
सोनेगांव, नागपूर.

## पार्श्वभूमी :–

युनेस्काने १९९३ मध्ये नियुक्त केलेल्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आयोागने १९९६ मध्ये आपला अहवाल सादर केला या अहवालात शिक्षणाचे चार आधारस्तंभ सांगण्यात आले आहेत.

१) कसे शिकावे हे शिकणे (Learning to learn)

२) कार्यप्रवणता (Learning to do)

३) आपल्या क्षमतांचा सर्वांगिण विकास (Learning to be)

४) सहजीवन (Learning to live together)

प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या हे आपल्या शिक्षणासमोरील एक मोठे आव्हान आहे. लोकसंख्या वाढीमुळे विद्यार्थी संख्येत सुध्दा सातत्याने वाढ होत आहे. सर्व विद्यार्थ्यांच्या गरजा अभिरुची व क्षमता भिन्न – भिन्न असतात.

विज्ञानाची प्रगती, औद्योगिक क्रांती, आर्थिक, राजकीय, सामाजिक गरजा व समस्या, परिवर्तनशील परिस्थिती व तणाव यामुळे कुटुंब संस्था आपल्या मुलांवर सुसंस्कार करण्यास असमर्थ ठरत आहे. बहुतेक शाळांमध्येही संस्कारक्षम वातावरण दिसून येत नाही. शाळामधील वातावरण निर्मीतीत संचालक मुख्याध्यापक, शिक्षक यांचे सृजनशील नेतृत्व कमी पडत आहे.

शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष देवू शकत नाही. वर्गातील सक्षम विद्यार्थ्यांचा कितपत उपयोग होवू शकतो याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनामध्ये **"बेंच नेता प्रणालीची उपयुक्तता"** एक प्रायोगिक अध्ययन हा विषय निवडण्यात आलेला आहे.

## संशोधन समस्या :–

## “बेंच नेता प्रणालीची उपयुक्तता” –एक प्रायोगिक अध्ययन

## संशोधनाची उद्दिष्टे :–

- ❋ विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्तरावर मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.
- ❋ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करणे.
- ❋ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे.
- ❋ नियंत्रितगट व प्रायोगिक गट यामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाची तुलना करणे.
- ❋ नियंत्रितआणि प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या क्रिडाविषयक प्रगतीची तुलना करणे.
- ❋ नियंत्रितआणि प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासपुरक उपक्रमातील कार्यप्रवणतेची तुलना करणे.
- ❋ बेंच नेता प्रणालीच्या परिणामकारकतेचे आणि उपयुक्ततेचे अध्ययन करणे.

## परिकल्पना :–

संख्याशास्त्रीय विश्लेषणाच्या दृष्टिने वरील उद्दिष्टांचे रुपांतर खाली निर्देशीत चौदा परिकल्पनांमध्ये करण्यात आले :–

- ❋ नियंत्रितगटामधील विद्यार्थ्यांच्या प्रथम आणि द्वितीय सत्रांत परिक्षेतील संपादनात लक्षणीय फरक आढळून येत नाही.
- ❋ प्रायोगिक गटांमधील विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रांत व द्वितीय सत्रांत परिक्षेमधील संपादनात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या वर्गातील वर्तनात सकारात्मक दिशेने फरक जाणवतो.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे वर्गातील शीस्तविषयक समस्या कमी होतात.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची सामाजिक समायोनजक्षमता वृध्दिंगत होते.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमितपणा येतो.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे गृहपाठ पूर्ण करण्याच्या प्रमाणात वाढ होते.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे वर्गातील विद्यार्थ्यी वहयापुस्तके नियमितपणे आणतात.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे खेळातील सहभागामध्ये वृध्दि होते.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे शाळेतील अभ्यासपूरक कार्यक्रमात भाग घेण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांमध्ये 'स्व' विषयी जागृती निर्माण होते.
- ❈ शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बेंच नेता प्रणाली पोषक ठरते.
- ❈ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी बेंच नेता प्रणाली उपयुक्त ठरते.
- ❈ बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती होते.

## संशोधनाची व्याप्ती व परिमर्यादा :–

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा विचार करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधन फक्त शहरी विभागापूरतेच व त्यातही केवळ ३ शाळामधील वर्ग ८ च्या सहा तुकडयांपूरतेच परिमर्यादित करण्यांत आले.

## संशोधन न्यादर्श :–

तीनही शाळांमधून नियंत्रितगटासाठी १२३ विद्यार्थी व प्रायोगिक गटासाठी १५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली तसेच २५ शिक्षकांची, १ मुख्याध्यापक, २३ निरनिराळे विषय शिक्षक व १ शारिरीक शिक्षक यांचा समावेश करण्यात आला.

## संशोधनाची कार्यवाही :–

प्रस्तुत अध्ययन मुलतः 'प्रायोगिक' स्वरुपाचे होते. प्रायोगिक अध्ययनामध्ये विशिष्ट घटकांचा उपयोग केला असता विशिष्ट परिणाम दिसतात. केवळ परिकल्पनेचे परीक्षण ही बाब या संशोधनात अपेक्षित नसून उपयुक्तता पडताळून पाहणे याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. "बेंच नेता" हा या अध्ययनाचा केंद्रबिंदु आहे. बेंच नेता म्हणजेच वर्गातील प्रत्येक रांगेकरीता नेमण्यात येणारा गटप्रमुख विद्यार्थी, वर्गखोलीत प्रत्येक रांगेत १४–१५ विद्यार्थी असतात. स्वत:च्या रांगेतील सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी सांभाळू शकेल असा विद्यार्थी वर्ग शिक्षकांचा सल्ला घेऊन निवडण्यात आला. (प्रत्येक रांगेत इतर विद्यार्थ्यांचे नेतृत्व करु शकेल असा एखादा तरी विद्यार्थी असतोच.) त्याच्याकडे एक नोंदवही देऊन विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाशी सबंधीत बाबींच्या नोंदी घेण्यास सांगण्यात आले. सुमारे पाच महिने (एक सत्र) बेंच नेत्याने आपल्या रांगेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्व घडामोडीवर दररोज लक्ष ठेवून नोंदवहीत नोंदी घेतल्या. आवश्यक तेथे मार्गदर्शन देणे, प्रोत्साहन देणे हे कार्य सुध्दा बेंच नेत्याकडे सोपविण्यात आले.

नियंत्रित गटातील तीन्ही तुकडयांमधील विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय सत्रांत परीक्षेतील गुणांची नोंद शाळेच्या रिझल्ट रजिस्टरवरुन घेण्यात आली. प्रायोगिक गटातील तीन्ही तुकडयांमधील सुध्दा विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय सत्रांत परीक्षेतील गुणांची नोंद घेण्यात आली. विषयशिक्षक आणि गटप्रमुखांच्या माध्यमातून विद्यार्थी जीवनाशी सबंधित इतर घटकांचीसुध्दा दखल व नोंद घेण्यात आली.

## संशोधन पध्दती :–

प्रस्तुत शोध कार्याकरिता प्रायोगिक संशोधन पध्दतीची निवड केली.

## संख्याशास्त्रीय तंत्रे व सुत्रे :–

निष्कर्ष काढण्यासाठी मध्यमान, प्रमाण, विचलन, टी–परिक्षण, काय स्क्वेअर $x^2$ इ. चा वापर करण्यात आला.

## निष्कर्ष :–

### नियंत्रितआणि प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन मध्यमानाची सार्थकता दर्शविणारी सारणी :–

**सारणी क्र. 1**

| अ.क्र. | गट | विद्यार्थी संख्या | चल | t मूल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| १ | नियंत्रीत | १२३ | शैक्षणिक संपादन | ०.१५३ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| २ | प्रायोगिक | १५० | शैक्षणिक संपादन | ५.०२३ | ०.०१ स्तरावर सार्थक |

**शिक्षक प्रतिसादाचे काय स्क्वेअर मूल्य दर्शविणारी सारणी :–**

**सारणी क्र. 2**

| क्र. | fo | fe | काय स्क्वेअर मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|
| १. | २३ | १२.५ | १६.०० | ०.०१ (६.६३५) |
| २. | २१ | १२.५ | १०.२४ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ३. | २१ | १२.५ | १०.२४ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ४. | २२ | १२.५ | १२.९६ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ५. | २४ | १२.५ | १९.३६ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ६. | २० | १२.५ | ७.८४ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ७. | १८ | १२.५ | ४.०० | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| ८. | १९ | १२.५ | ५.७६ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| ९. | २४ | १९.३६ | १९.३६ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| १० | २१ | १२.५ | १०.२४ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| ११. | २० | १२.५ | ७.८४ | ०.०१ स्तरावर सार्थक |
| १२. | २५ | १२.५ | २३.०४ | ०.०१ स्तरावर सार्थक |

**सारणी क्र. 1 चे निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढण्यात आलेत.**

१) नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रांत आणि द्वितीय सत्रांत परीक्षेतील शैक्षणिक संपादनाच्या मध्यमानाची लक्षणीयता पाडताळून पाहिली असता t चे मूल्य ०.१५३ असल्याचे आढळून आले. याचा अर्थ असा की, नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रांत आणि द्वितीय सत्रांत परीक्षेतील संपादनात लक्षणीय फरक पडत नाही. ( $t = 0.153$ सारणी क्र. १)

२)  प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या प्रथम आणि द्वितीय सत्रांत परीक्षेतील शैक्षणिक संपादनाच्या मध्यमानाची लक्षणीयता t चे मूल्य ५.०२३ असल्याचे आढळून आले. वरील मूल्य ०.०१ स्तरावर सार्थक असल्यामुळे शुन्य परिकल्पनेचा परित्याग करुन प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय सत्रांत परीक्षेतील शैक्षणिक संपादनात लक्षणीय फरक पडतो असा निष्कर्ष काढण्यात आला. ( $t = 5.023$ सारणी क्र. १)

विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रांत परीक्षेतील संपादनापेक्ष द्वितीय सत्रांत परीक्षेतील संपादन जास्त असल्याचे आढळून आले. या वरुन संपादनातील ही वृध्दी निश्चितपणे बेंच नेता प्रणालीच्या अवलंबामुळे झाली असे सप्रमाण सिध्द होते.

**सारणी क्र. 2 चे निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढण्यात आलेत.**

शाळेत घेण्यात आलेल्या प्रथम सत्रांत परीक्षा व द्वितीय सत्रांत परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीला शैक्षणिक संपादन असे संबोधण्यात आले.

प्रत्येक स्थितीत नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांपेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन उच्च दर्जाचे असल्याचे आढळून आले. एवढेच नव्हे तर या गटांचा फरक लक्षणीय असल्याचे आढळून आले.

तसेच शिक्षकांना व गटनायकांना देण्यात आलेल्या प्रश्नावलीवरुन असे दिसून आले की, बेंच नेता प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या वर्गातील वागणूकीत नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा, व ‘स्व’ ची जागृती निर्माण होते. शैक्षणिक उद्दिष्टे, व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास आणि शैक्षणिक प्रगती साध्य करण्याससुध्दा बेंच नेता प्रणाली उपयुक्त असल्याचे सप्रमाण सिध्द झाले.

यावरुन बेंच नेता प्रणाली ही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन सुधारण्याच्या दृष्टिने व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वातील सर्वांगीण विकासाकरिता परिणामकारक ठरते असा विष्कर्ष निघतो.